रेग्युलर दिवाणी कज्ञा क्र. २०/२०२२
ओंकार सज्रेराव नरके
विरुध्द
श्री.सर्जेराव गणपती नरके

निशाणी १७ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. २ यांनी हिंदु दत्तक आणि पोटगी कायदा १९५६ चे कलम २३ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांचेकडून पोटगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी वादी क्र. २ यांचे असे कथन आहे की, दावा कलम १ व प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेली मौजे केखले ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील मिळकत "अ" व मिळकत क्र. "ब" ही वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांची वडीलार्जीत मालकी हक्क वहिवाटीच्या मिळकती आहेत. वादी क्र. २ हिचा विवाह प्रतिवादी क्र. २ यांचेबरोबर दिनांक २१.०२.१९९२ इ. रोजी ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि.सांगली येथे झालेला आहे. सदर लग्नसंबंधातून त्यांना वादी क्र. १ तसेच प्रतिवादी क्र. २ व ३ ही अपत्ये आहेत.

३. प्रतिवादी क्र. १ हे वादी क्र. २ हिला त्यांना दोन्ही वेळेस मुलीच झाल्या या कारणावरुन मानसीक व शारिरिक त्रास देत होते. वादी क्र. २ ही वादी क्र. १ याच्या जन्मानंतर त्यांच्या माहेरीच राहत आहेत. वादी क्र. २ हिने प्रतिवादी क्र. १ यांचेकडे त्यांची व मुलांची पोटापाण्याची व जगण्याची सोय करावी म्हणून विनंती केली तरी देखील प्रतिवादी क्र. १ याने स्पष्ट शब्दात नकार दिला म्हणून वादी क्र.२ यांनी इस्लामपुर न्यायालयात क्रि.कि.अ.क्र. ११२/२००२ हा पोटगी ठरवून मिळणेकरीता दाखल केला. त्यामध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी वादी क्र. १,२ व यांना प्रत्येकी ३००/- व प्र.वादी.क्र. २ व ३ यांना प्रत्येकी ५००/- रुपये प्रमाणे पोटगी मंजूर करणेत आली. प्रतिवादी क्र. १ यांनी दुसरा बेकायदेशिर विवाह केला असून त्याबाबत वादी यांनी पोलिस ठाणेस तक्रार केली परंतू पोलिसांनी त्यांची दखल घेतली नाही. त्यामुळे वादी क्र. २ यांनी मोलमजुरी करुन वादी क्र. १ यांचे शिक्षण पुर्ण केले व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे विवाह देखील करुन दिले. सबब वादी क्र. २ या अल्पशिक्षीत व अडाणी असल्याचे गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकती त्याचे एकट्याचे नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळकत त्रयस्थ इसमांना विकून तबदील करणेच्या विचारात आहेत. प्रतिवादी क्र.१ हे शेतजमिनीतून उत्पन्न घेतात तसेच त्यांचा केखले येथे फर्निचर बनवण्याचा कारखाना व शोरुम असून त्यातून त्यांना वार्षीक १५ ते २० लाख आर्थीक उत्पन्न घेतात. त्यामुळे वादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे १/४ हिस्सेपैकी प्रत्येकी १/५

हिस्सा विभागून मिळपर्यंत वादी क्र. २ यांना पोटी म्हणून दरमहा रुपये ५०००/- मिळावेत अशी विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केली आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी १९ वर म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. वादी क्र.२ यांनी दावा तसेच प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेपुर्वी सत्य वस्तुस्थितीचा कोठेही उल्लेख केलेला नाही तसेच वादी क्र.१ हे नोकरी व्यवसाय करुन उत्पन्न मिळवितात, वादी क्र. १ व २ यांचे नांवे घर मिळकती व शेतमिळकती असून त्याबाबत वादींनी उल्लेख केलेला नाही. केवळ प्रतिवादीस त्रास देणेचे हेतूने व दावेची चौकशी लांबविणेचे हेतून वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब वादीचा अंतरिम निर्वाळा भत्ता मिळणेसाठीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी क्र. २ तर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा कोणत्याही कारणाशिवाय त्याग केला आहे. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही सोय केली नाही. सबब प्रतिवादी क्र.१ यांनी वादी क्र. २ यांना दरमहा पाच हजार रुपये अंतरिम पोटगी द्यावी अशी विनंती केली आहे. वादी क्र.२ च्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादीच्या समर्थनार्थ **मा. ओरीसा उच्च न्यायालयाच्या, *पुरुषोत्तम विरुध्द अन्नपुर्णा ए.आय.आर.१९९७ ओरीसा ७३*** मध्ये प्रकाशित झालेला न्यायनिवाडा दाखल केला आहे. मा.उच्च न्यायालयाने सदरील न्यायानिवाडयात असा निर्वाळा नोंदविला आहे की, "*अंतरिम पोटगी हुकुम करण्याचा न्यायालयाला मुलभुत अधिकार आहे*".

६. प्रतिवादी क्र.१ च्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, जर एखाद्या स्त्रीला पुर्वीच्या प्रकरणात पोटगी मिळाली असेल तर तिला नव्याने नवीन प्रकरणात पोटगी मागता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ च्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादीच्या समर्थनार्थ **मा.मुंबई उच्च** न्यायालयाच्या **विजयकुमार विरुध्द सौ.भाग्यवती**, या खटल्यातील **२००९ ऑल एम.आर. (क्रि.)४८८** मध्ये प्रकाशीत झालेला न्यायनिवाडा दाखल केला आहे. मा.उच्च न्यायालयाने सदरील न्यायानिवाड्यात असा निर्वाळा नोंदविला आहे की, " *जर एखाद्या प्रकरणात अंतरिम पोटगी दिली असेल तर अर्जदार पत्नी पुन्हा नव्याने दुस-या प्रकरणात अंतरिम मनाई मागू शकत नाही*". प्रस्तुत न्यायनिवाडयामध्ये अर्जदार महिलेला घटस्फोटाच्या प्रकरणात अंतरिम पोटगी मिळाली होती व तिने नव्याने हिंदु विवाह कायद्याप्रमाणे प्रकरण दाखल केले होते ते उच्च न्यायालयाने स्थगीत केले होते. प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला न्यायनिवाडा व तथ्ये वेगवेगळी असल्याने सदर न्यायनिवाडा प्रतिवादीस उपयुक्त ठरत नाही.

७. अर्ज म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले. वादी क्र.१ हा प्रतिवादी क्र. १ यांचा मुलगा आहे. वादी क्र.२ या प्रतिवादी क्र. १ यांच्या पत्नी आहेत. वादी , प्रतिवादी यांच्यामधील नातेसंबंध वादग्रस्त नाहीत ते उभयपक्षकारांना मान्य आहे. वादी क्र.२ यांनी हिंदु दत्तक व पोटगी कायद्यातील तरतुदीनुसार प्रकरणात अंतरिम पोटगी मागीतली आहे. हिंदु दत्तक व पोटगी कायदा १९५६ च्या कलम २३ प्रमाणे विवाहीत महिला तिच्या पतीकडून पोटगी मागू शकते. पत्नीचे उदरनिर्वाहाची सोय करणे व सांभाळ करणे हिंदु कायद्यानुसार पतीची जबाबदारी आहे. वादी क्र.१ व २ हे प्रतिवादी क्र.१ यांच्यासोबत राहत नाहीत ही बाब वादग्रस्त नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी क्र.२ यांच्या उदरनिर्वाहाबाबत कोणती तरतुद केली आहे असे प्रतिवादी क्र. १ यांचे कथन नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी दुसरा विवाह केलेला आहे असे वादीचे कथन आहे परंतू प्रतिवादी क्र. १ याने ते नाकारलेले नाही. सबब वादी क्र. २ या प्रतिवादी क्र. १ यांच्या पत्नी आहेत. प्रतिवादी क्र. १ हे वादी क्र. २ यांचा सांभाळ करत नाहीत. तसेच त्यांच्या उदरनिर्वाहाकरीता त्यांनी कोणतीही तरतुद केलेली नाही या बाबी स्पष्ट होतात.

८. प्रतिवादी क्र. १ यांचे असे कथन आहे की, वादी क्र. २ यांना यापुर्वी इस्लामपुर येथील फौजदारी न्यायालयाने पोटगी दिलेली आहे. सदरील पोटगीचा आदेश होवून देखील वादी क्र. २ यांनी त्याची अंमलबजावणीसाठी काहीही केलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, इस्लामपुर येथील फौजदारी न्यायालयाने वादी क्र. २ यांना सन २००३ मध्ये रक्कम रुपये ३००/- दरमहा पोटगी मंजूर केली आहे. सदरील पोटगी आदेशाची अंमलबजावणी वादी क्र. २ यांनी केलेली नाही त्यामुळे त्यांना पोटगीची गरज नाही असा निष्कर्ष या प्राथमीक स्थितीत अंतरिम अर्जाचे सुनावणी वेळी काढता येवू शकत नाही. जरी वादी क्र. २ या त्यांच्या सज्ञान मुलासोबत राहत असल्या तरी त्यांच्या पालनपोषणाची प्राथमीक जबाबदारी प्रतिवादी क्र. १ यांची आहे. वादी क्र. २ यांना मिळकतीचे साधन आहे किंवा नाही अथवा त्या स्वतःचा सांभाळ करण्यास पात्र आहेत या बाबी अंतिम सुनावणीवेळी गुणदोषांवर निकाली कराव्या लागतील.

९. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी केलेला आहे. जरी पत्नीला तिच्या पतीच्या हयातीत वाटप मागता येत नसले तरी इतर कोणी सहहिस्सेदाराने वाटप सुरु केले तर तिचा हिस्सा ठरविला जावू शकतो. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. १ यांच्या मुलाने म्हणजे वादी क्र. १ याने वाटपासाठी दाखल केला आहे. दावा मिळकतीमध्ये वादीचा हिस्सा नाही असे प्रतिवादीचे कथन नाही. प्रतिवादीने हक्कसंबंध नाकारलेले नाहीत. अशापरिस्थितीत दावा चालणेस पात्र

नाही असे म्हणता येणार नाही.

१०. वरील चर्चिले तथ्ये व परिस्थितीनुसार प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची पत्नी वादी क्र. २ यांच्या उदर निर्वाहासाठी कोणतीही तरतुद केलेली नाही केवळ एका प्रकरणात पोटगी आदेश झालेला आहे त्यामुळे इतर प्रकरणात पोटगी मागता येणार नाही असे निष्कर्ष या प्राथमीक स्थितीत काढता येणार नाहीत. यापुढे जावून वादी क्र. २ यांना पुर्वीच्या आदेशाप्रमाणे पोटगी दिल्याचे प्रतिवादी क्र.१ यांचे कथन नाही. प्रस्तुतचा दावा नजीकच्या काळात गुणदोषावर निकाली होईल अशी परिस्थिती नाही. सबब हिंदु विवाह कायदा व हिंदु दत्तकविधान व पोटगी कायद्यातील तरतुदीनुसार वादी क्र २ या अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत.

११. वादी क्र.२ व प्रतिवादी क्र.१ हे दोघेही मध्यमवयीन, अशिक्षीत शेतकरी कुटुंबातील सदस्य आहेत. वादी क्र.२ या स्वतः कमावत्या आहेत असे प्रतिवादी क्र. १ यांचे कथन नाही. प्रतिवादी क्र. १ यांचे निश्चीत मासीक उत्पन्न जरी अभिलेखावर नसले तरी ते अकुशल कामगाराप्रमाणे दरडोई उत्पन्न मिळविण्यास पात्र आहेत. वादी क्र.२ या त्यांच्या सज्ञान मुलासोबत राहतात. तसेच त्यांना फौजदारी न्यायालयाने दरमहा ३००/- रुपये इतकी पोटगी दिलेली आहे. वादी क्र. २ व प्रतिवादी क्र.१ यांच्या राहणीमानाचा व वरील सर्व परिस्थितीचा विचार करता वादी क्र. २ या दरमहा १०००/- रुपये इतक्या अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत. वरील सर्व तथ्ये व चर्चिले परिस्थितीनुसार वादी क्र. २ यांचा अर्ज अंशतः मंजूर करणे योग्य आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश.

१. अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी क्र. २ यांना दरमहा रक्कम रुपये १०००/- इतकी अंतरिम पोटगी अर्ज दाखल केल्या तारखेपासून दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत द्यावी.

**(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)**

सही/-

दिनांक १३.०२.२०२४.

अतुल अ.कोरे ,
सह.दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.,पन्हाळा .